## मनोगत

संसाराच्या रहाटगाडग्यात अडकलेल्या सामान्य मनुष्याला संसारातल्या अनंत अडीअडचणी भेडसावत असतात. सर्वच अडचणींवर मात करणं त्याला शक्य होतंच असं नाही. बरेचदा तो आपल्या इच्छा-आकांक्षांशी तडजोडही करतो. परंतु तरीही काही विशिष्ट सांसारिक सुखांची आस त्याला लागलेली असते, जी त्याला स्वस्थ बसू देत नाही. जोपर्यंत त्याची ती विशिष्ट अडचण निवारण होऊन ते विशिष्ट सुख त्याला प्राप्त होत नाही, किंवा मग त्या सुखातला फोलपणा त्याला समजून येत नाही, तोपर्यंत त्याचं मन त्याला अध्यात्माकडे वळू देत नाही. संसारातल्या अशा कोणत्या तरी अडचणीच्या निवारणाच्या चिंतेत असलेल्या मनुष्याला अध्यात्म सांगणं म्हणजे ज्याच्या पोटाची खळगी भरलेली नाही, अशाला अन्न देण्याऐवजी निसर्गसौंदर्य दाखवत बसण्यासारखं आहे. कोणत्या तरी सुखाला आसावलेला मनुष्य अध्यात्माकडे वळू शकत नाही हे सत्य आहे, कारण त्या सुखाचा अभाव त्याच्या वैराग्यासाठी साधक ठरतोच असं नाही, उलट बहुतांशी वेळेला तो बाधकच ठरण्याची शक्यता जास्त असते. अशावेळी लवकरात लवकर त्याचं पूर्वकर्म धुतलं जाणं आणि त्याच्या त्या अडचणीचं निवारण होऊन त्याच्या आध्यात्मिक वाटेवरचा तो अडथळा दूर होणं जास्त महत्त्वाचं असतं. ह्यासाठी अत्यंत प्राचीन काळापासून मंत्रशास्त्राचा वापर केला गेला आहे. आपल्या संस्कृतीत वेदकाळापासून पुराणकाळापर्यंत, किंबहुना त्यानंतरही कित्येक अधिकारी व्यक्तींनी विविध मंत्र सामान्य जनांना दिलेले आहेत. विशिष्ट इच्छापूर्ती करून देणारे मंत्र जसे ऋग्वेदात आहेत, भगवद्‌गीतेत आहेत, दुर्गासप्तशतीत आहेत, तसेच ते ज्ञानेश्वरीतही आहेत. तसाच अर्वाचीन काळातला श्री स्वामी महाराजांनी 'मंत्रात्मक श्लोका'ची रचना करून साधलेला हा एक प्रभावी प्रयत्न आहे.

मंत्रशास्त्राला पूरक असं आणखी एक शास्त्र आपल्या पूर्वसुरींनी विकसित

केलं, ते म्हणजे यंत्रशास्त्र. विशिष्ट इच्छापूर्तीसाठी अनेक यंत्रं आपल्या संस्कृतीने दिली आहेत, ''श्री''प्राप्तीसाठी, संततीप्राप्तीसाठी, वास्तुशमनासाठी इथपासून ते अगदी पाऊस पडावा किंवा थांबावा इथपर्यंतही अनेक मंत्र आणि त्यांना पूरक अशी यंत्रं आपल्या संस्कृतीत सांगितली आहेत. यंत्रशास्त्र आणि श्री स्वामी महाराजांनी दिलेले मंत्रात्मक श्लोक ह्यांचा समन्वय साधून हे श्लोक आणि त्यांच्याशी संबंधित अशी पूरक यंत्रं समाजापुढे सादर करण्याची आवश्यकता होती, जी सद्‌गुरुतत्त्वाने पूर्ण केली आहे.

हे सर्वच्या सर्व मंत्र विलक्षण परिणामकारक आहेत. जिज्ञासू व्यक्तींनी ते जरूर अनुभवावेत. विशिष्ट इच्छापूर्तीच्या मंत्रासाठी सांगितलेली जपसंख्या व्यक्तिमानपरत्वे कमी-जास्त होऊ शकते आणि त्याची कारणं पुस्तकात दिलेली आहेत, ती देखील अभ्यासावीत. परंतु ही साधना करताना, ज्याप्रमाणे पक्षिणी कितीही उंच उडाली तरी तिचं लक्ष तिच्या घरट्याकडे बरोब्बर असतं, त्याप्रमाणे कितीही सांसारिक इच्छा असल्या, तरी प्रत्येक दुःखाला शेवट आहे आणि प्रत्येक सुखालाही शेवट आहे हे जाणून परमार्थावरची आपली नजर हटवू नये. एवढं ध्यानात ठेवून दिलेल्या मंत्र साधना कराव्यात किंवा ह्या स्तोत्राचं पठण निदान दिवसातून एकदा तरी करावं. ह्या पुस्तकातल्या मंत्रसिद्धतेच्या अटी, जसं की तो गुरुमुखातून मिळाला पाहिजे, त्याच्या पठणात एकाग्रता आणि सातत्य असायला पाहिजे इत्यादि समजून घेऊन, त्या अनुसरून प्रत्येकाने आपली विवक्षित इच्छापूर्ती जरूर करून घ्यावी पण त्यानंतर अतिरेकी हव्यास न बाळगता अध्यात्मातही अग्रेसर व्हावं, तेवढं बळ साधक-वाचकांना मिळावं, हीच सद्‌गुरुतत्त्वाचरणी प्रार्थना.

– बापट गुरुजी